**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई-२३.**
**E.mail.- dycomminspection@gmail.com, Tel. ०२२-२२६६०१६३.**

विषय:- रात्र गस्त / नाकाबंदी व अनुज्ञप्ती निरीक्षणाबाबत.

# परिपत्रक

क्रमांक: संकीर्ण-११२००२/एफएल-३/सात                    मुंबई, दिनांक १५ जुलै, २०१६.

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक दैनंदिनी-१०१४/१४६२/१४/तीन, दिनांक ७ जानेवारी, २०१६ नुसार राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांच्या कामाची वारंवारीता निश्चित करण्यात आली आहे. तसेच परिपत्रक क्रमांक डिईटी-११२०१६/१२४/उद्दिष्ट पुर्तता/नऊ, दिनांक १३ एप्रिल, २०१६ नुसार सर्व कार्यकारी व भरारी पथकांच्या गुन्हा अन्वेषणाचे सुधारीत उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने राज्य उत्पादन शुल्क विभागास सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता रु. १५,००० कोटीपेक्षा जास्त महसुली उद्दिष्ट दिलेले आहे. सदर उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या दृष्टीने उपरोक्त दोन्ही परिपत्रका व्यतिरिक्त पुढील प्रमाणे नव्याने निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

सर्व विभागीय उप आयुक्त, अधीक्षक व उप-अधीक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रमुख अनुज्ञप्तींचे दरमहा अचानकपणे सखोल निरीक्षणे करावीत. निरीक्षणात जातीने सहभागी रहावे. अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी यांना पाठवून निरीक्षणे केली असे दाखवू नये. तसेच केलेली निरीक्षणे व आढळून आलेल्या नियमभंगाबाबत विभागीय उप आयुक्त व अधीक्षक यांनी दरमहा ८ तारखेपर्यंत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अर्ध-शासकीय पत्राद्वारे सविस्तर अहवाल सादर करण्याची दक्षता घ्यावी.

तसेच सर्व भरारी पथक, विभागीय भरारी पथक व महाराष्ट्र भरारी पथक तसेच कार्यकारी निरीक्षक/दुय्यम निरीक्षक यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त महसुली उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या दृष्टीने अवैध दारुधंद्याच्या निर्मिती, वाहतूक व विक्री याबाबत ठोस परिणामकारक कार्यवाही करावी. तसेच निरीक्षक/ दुय्यम निरीक्षक व अधीक्षक यांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये रात्रीची दैनंदिन गस्त करावी व मुंबई शहर, मुंबई उपनगरे, ठाणे, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक या शहरामध्ये सर्व शनिवार व रविवार तसेच सलग येणा-या सुट्टयांमध्ये आपआपल्या कार्यक्षेत्रात रात्री उशिरापर्यंत गस्त करावी.